'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० | मासिक वर्गणी : १४**


# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com


साप्ताहिक शब्दरुतूला वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा
शब्दांच्या स्पर्शाने भिंतींचे आकाश बनो...
शब्दालय प्रकाशन
**शब्दालय प्रकाशन**
महाराष्ट्र शासनाचा वि.पु. भागवत व इतर अनेक नामवंत पुरस्कारप्राप्त संस्था
**आपले ग्रंथालय/कॉलेज/शाळा/व्यक्तिगत पुस्तके मागवण्यासाठी आजच संपर्क करा : मो. ९०११२०१४१४**

* वर्ष ३ रे * अंक १ ला * रविवार दि. ०५ ऑक्टोबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक(Weekly)

**नवी कोरी पुस्तकं**




**जन्म जन्मांतर**
: लेखकाचे नाव :
**ॲड. गोपाळ गोरवाडकर**
किंमत रु. : २३०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**कुणास्तव कुणीतरी**
: लेखकाचे नाव :
**ॲड. गोपाळ गोरवाडकर**
किंमत रु. : १८०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# जनतेचा विश्वास जपण्याचे काम करा

## ना. विखे पाटील : जिल्ह्यात ३३८ तरूणांना शासकीय नोकरीचे नियुक्ती पत्र

**लोणी :** शासकीय सेवेत दाखल होणाऱ्या तरुणांसाठी ही संधी केवळ नोकरी नसून जनतेच्या सेवेसाठीचे मोठे दायित्व आहे. नियुक्ती पत्र मिळालेल्या तरुणांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे, त्यांना दिलासा देण्याचे व प्रशासनावरील जनतेचा विश्वास दृढ अधिक वाढण्यासाठी काम करावे, असे आवाहन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. (पान २ वर)

> ❝ ही केवळ नियुक्ती नसून राज्याच्या विकासासाठी योगदान देण्याची संधी आहे. पूर्वी अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया क्लिष्ट व वेळखाऊ होती, परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ती जलद, सुलभ व पारदर्शक करण्यात आली आहे. आता जिल्हाधिकारी स्तरावरच अनुकंपा नियुक्ती अधिकार दिल्याने जलद व पारदर्शक नियुक्ती प्रक्रिया पार पडणार आहे.
>
> **राधाकृष्ण विखे पाटील,**
> पालकमंत्री

**शासकीय नोकरी ही सेवा**



# पूरग्रस्तांकडून कर्जवसुली थांबवा

## मुख्यमंत्री फडणवीसांचे बँकांना निर्देश



**मुंबई :** राज्यातील पूरग्रस्त शेतकरी व नागरिकांना दिलासा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकांना कर्जवसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असून, त्यांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, पूरामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर बँकांनी कर्जवसुलीचा तगादा लावू नये. पूरग्रस्त कुटुंबांना तातडीने गहू, तांदूळ, डाळी आणि आवश्यक वस्तूंचे किट वितरित करण्यात येत आहेत. शेतजमीन खरडून जाणे, विहिरी खचणे अशा प्रकारच्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्रपणे मदत (पान २ वर)

# कुणबीचे चुकीचे दाखले दिल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई



**मुंबई :** मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयावरून ओबीसी समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यात आला असून, बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्याअधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि त्यांनाच जबाबदार धरले जाईल, असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती महसूलमंत्री व ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

तसेच, राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता १० ऑक्टोबर रोजी होणारा मोर्चा मागे घेण्याची विनंतीही मुख्यमंत्र्यांनी ओबीसी शिष्टमंडळाला केल्याचे त्यांनी सांगितले. ओबीसीशिष्टमंडळासोबत सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण आणि वातावरण बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास व बहुजन कल्याण दुग्धविकास (पान २ वर)

## भारत मातेच्या प्रतिमेसह १०० रुपयांचे नाणे जारी

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) १०० व्या वर्धापन दिनानिमित्त दिल्ली येथे डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १०० रुपयांचे स्मारक नाणे आणि टपाल तिकिट जारी केले. या नाण्यावर भारत मातेची प्रतिमा आहे.

# भारत कधीच अपमान सहन करीत नाही

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेले कर अपयशी ठरला आहे. मुळात म्हणजे भारत आणि चीन हे दोन्ही देश अत्यंत स्वाभिमानी देश आहेत. भारतीय लोक कधीच त्यांचा अपमान सहन करत नाहीत.



मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खूप चांगल्याप्रकारे ओळखतो. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने युक्रेन युद्धाला भारत रशियाला सहकार्य करत असल्याचा आरोप अमेरिका करत करत आहे, असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी म्हटले आहे. भारताने अगोदरच स्पष्ट केले की, आम्ही आमच्या नागरिकांच्या हितासाठी ज्या गोष्टी आहेत, त्याबद्दलचे निर्णय घेतो. नाटोवर रशियाच्या हल्ल्याची खोटी भीती निर्माण करत आहे. हा हवेतून काढलेला मूर्खपणा आहे. रशिया कोणत्याही चिथावणीला प्रत्युत्तर देईल.




२०२५ दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



आशयसंपन्न लेख, कथा आणि कविता यांची मेजवानी घेऊन
**शब्दालय दिवाळी अंक २०२५**
लवकरच येत आहे!

**विशेष लेख**

**कितीही पुढारलो, तरी आदिबंध आदिम संस्कृतीचेच!**
मुकुंद कुळे / ४
**संस्कृतींच्या प्रवाहांचे घाट**
अंजली चिपलकट्टी / २५
**म. सयाजीरावांचा मुदबकखाना – संस्कृतिसमन्वयाची प्रयोगशाळा**
चिन्मय दामले / ३८
**आदिवासी संस्कृती व आपण**
प्राची वैद्य–दुबळे /५१
**वारसा आणि प्रवाह**
नीरजा पटवर्धन / ७६
**नास्तिकता आणि बहुसांस्कृतिकता**
अभिजित देशपांडे / ८४
**संस्कृतिसंकर आणि भारतीय दृश्यकला**
मंगेश नारायणराव काळे / ९५
**नाळ या मातीतली तुटलेली नाही**
कामिल पारखे / ११३
**संस्कृती : स्थलांतराच्या नजरेतून**
निळू दामले / १३२
**महाराष्ट्रातल्या मुद्रणतंत्राचा उदय : संस्कृतिसंकर आणि महाराष्ट्राचं समाजकारण**
नीतीन रिंढे / १३८
**गाव, गोधडी आणि गांधी**
अभिधा निफाडे / १५६
**मंदिर–मशिदींचे शहर : मालेगाव**
विनोद गोरवाडकर / १७०

**कथा**

**अमरनाथची आई**
मूळ हिंदी कथा : जितेंद्र भाटिया
अनुवाद : जयप्रकाश सावंत / १५
**रुकार**
हिनाकौसर खान / ६०
**एकाकी**
निहार सप्रे / १४६
**जिवट दोरवा**
सुचिता घोरपडे / १६२

**ललित**

**वेडी माया वाया गेली!**
मधुकर धर्मापुरीकर / ९०
**दूर का राही**
प्रतिमा कुलकर्णी / १२४
**ठेविले अनंते राहू नये तैसेची**
उदय कुलकर्णी / १५२
**मनविसाव्याचा श्रावणझोका**
सरिता सोमाणी / १७८

**कविता / १८३ ते १९९**

कल्पना दुधाळ । सुचिता खल्लाळ । नीलकंठ कदम । मनीषा उगले । सारिका उबाळे । संजय कृष्णाजी पाटील । अरुण शेवते । नम्रता फलके । संजय पाटील । लता थोरात । हर्षदा सुंठणकर । भगवान निळे । प्रशांत असनारे । व्यंकटेश चौधरी । स्वप्निल चव्हाण । तुकाराम खिल्लारे । प्रमोदकुमार अणेराव.

शब्दालय **पुस्तकवारी**
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

**दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...**
**90 11 20 1414**

| अंकाचे नाव | किंमत रुपये | कालनिर्णय* | ३००/- | शिवतेज | १००/- | आपले छंद | ४००/- |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुभव | २५०/- | ललीत | ३००/- | शिवस्पर्श | १००/- | अर्थवेध | ३००/- |
| आश्लेषा | २५०/- | लोकमत दीपोत्सव* | ३९९/- | साप्ताहिक सकाळ* | २००/- | चपराक | ४००/- |
| अनघा | ३००/- | लोकसत्ता* | २००/- | सामना * | १५०/- | ग्राहकहित | २५०/- |
| अक्षरदान | ३००/- | लोकप्रभा* | ५०/- | साहित्य शिवार | २००/- | अपेक्षा | २००/- |
| अक्षर * | ३५०/- | मेनका | ३५०/- | साहित्य लोभस | १५०/- | मन:शक्ती | २००/- |
| अहेर | २५०/- | मौज | ४००/- | संयम | १८०/- | पुणे प्रतिष्ठान | २००/- |
| आनंदघन | ३००/- | महाराष्ट्र टाईम्स* | २००/- | उत्तम अनुवाद | ४००/- | नरवीर | १५०/- |
| चंद्रकांत | ४००/- | निहार | २००/- | वाघुर | ३५०/- | संगम | २००/- |
| चौफेर समाचार | ५००/- | पद्मगंधा | ४००/- | वसंत | ३००/- | हेमांगी | ३००/- |
| दीपलक्ष्मी | ३६०/- | पुरूष स्पंदन | ३००/- | वेदांतश्री | ३००/- | पुण्यभुषण | ३००/- |
| दीपावली | ३५०/- | पुरूष उवाच | २००/- | जडण घडण | २५०/- | पुणे पोस्ट | १२०/- |
| अक्षरधारा | ३५०/- | प्रपंच | ३५०/- | चौफेर साक्षीदार | २५०/- | ऊंसमळा | ४०/- |
| गंधाली | ३६०/- | पुढारी * | ३००/- | साहित्यरंजन | २५०/- | फुल टाईम पास | १००/- |
| हंस | ४५०/- | ऋतुरंग | ३००/- | पद्मरत्न | ४००/- | फुल मनोरंजन | १००/- |
| कथाश्री | ४००/- | रागिणी | २५०/- | मनोकल्प | ३००/- | उल्हास प्रभात | १००/- |
| किस्त्रीम | ३००/- | साधना | २००/- | साहित्य स्वानंद | १५०/- | समाज प्रतिबिंब | ३००/- |
| शब्दगांधार | २५०/- | केसरी | १५०/- | मैत्र | ३००/- | मिडिया वॉच | ३००/- |
| स्वरप्रतिभा | २५०/- | सत्याग्रही | २००/- | मेहता मराठी ग्रंथ जगत | १५०/- | गोंदण | १५०/- |
| शब्द शिवार | ३००/- | संस्कृती | ३००/- | समदा | १८०/- | थिंक पॉझीटीव्ह | २५०/- |
| व्यासपीठ | १५०/- | मुक्त शब्द | ३५०/- | वसा | ३५०/- | ॲग्रोवन* | २००/- |
| शब्दालय | ३५०/- | अक्षरलीपी | २५०/- | सकाळ मनी * | १५०/- | संवाद सेतू | २५०/- |
| व्हाईट स्पेस | २००/- | एकमेव वेगळा | २५०/- | एकता | २५०/- | शुभम | ३००/- |
| चांगुलपणाची चळवळ | २००/- | अक्षर मुद्रा | २५०/- | अक्षर वेध | ३९५/- | भवताल | ३००/- |
| अंतरंग | २००/- | अनुराधा | ३००/- | रत्नावली | २५०/- | आंतर भारती | ३००/- |
| आनंद तरंग | २५०/- | अलका | २७०/- | लयभारी | ३५०/- | कोकण मिडीया | २००/- |
| चतुरंग अन्वय | ३००/- | अनुराग | २७०/- | अक्षरधन | २४०/- | वास्तव | ३००/- |
| अक्षर भेट | १५०/- | गृहलक्ष्मी | ३२०/- | सृजन संवाद | ३५०/- | परन्तु | २००/- |
| पृथा | ३००/- | गृहशोभिका * | ९०/- | समिधा | २००/- | प्रफुल्ल टाईमपास | १५०/- |
| शब्दाई | ३००/- | माहेर | ३५०/- | इन साईट | २५०/- | फिल्मी बोलबाला | १५०/- |
| निनाद | ३००/- | मानिनी | ३५०/- | ब्रह्मज्ञान | २००/- | क्रांतीवीर | २००/- |
| सारांश | २००/- | मिळून साऱ्याजणी | १००/- | भविष्य | १५०/- | समाजसुधारक | २००/- |
| आवाज | ४५०/- | दीर्घ कथा | २००/- | भविष्य निर्णय | २००/- | शोध विज्ञानाचा | २००/- |
| मार्मिक | १२०/- | श्री व सौ | २००/- | धनुर्धारी | ३००/- | बिईंग वुमन | २५०/- |
| दिवाळी आवाज | ३८०/- | सुवासिनी | ३००/- | ग्रहांकित | ४००/- | आचार्य अत्रे | २५०/- |
| धमाल धमाका | ३००/- | विपुलश्री | ३५०/- | गृहबोली | २८०/- | सँडवीच | २५०/- |
| फिरकी | २००/- | वसुधा | २७०/- | ग्रहसंकेत | २००/- | अर्थकारण | २५०/- |
| हास्य धमाल | ३००/- | सासर माहेर | २५०/- | ज्योतिष ज्ञान | ३५०/- | खट्टामिटा | २२५/- |
| जत्रा | ३५०/- | गृहशोभा | १५०/- | ज्योतिष तंत्र आणि मंत्र | ३००/- | | |
| मोहिनी | ४५०/- | | | मंत्र तंत्र तोडगे | २५०/- | | |
| महाराष्ट्राची जत्रा | ३००/- | | | वार्षिक राशी भविष्य | २५०/- | | |
| प्रभात | २००/- | | | ग्रहवेध | २५०/- | | |
| श्यामसुंदर | ३००/- | | | रेकी | २००/- | | |
| रविवारची ध. जत्रा | २५०/- | | | आनंदी वास्तू तोडगे | २२०/- | | |
| भन्नाट | १५०/- | | | | | | |
| गुंफन | २००/- | | | | | | |
| टिंगल टवाळी | २२०/- | | | | | | |
| विनोदी कथा | २२०/- | | | | | | |
| विनोद वल्ली | २२०/- | | | | | | |
| आला रे आला | २२०/- | | | | | | |
| हा . हा . हा | २५०/- | | | | | | |
| सुभाषित | २५०/- | | | | | | |
| सुहास्य जत्रा | ३००/- | | | | | | |
| हास्यानंद | २५०/- | | | | | | |

शब्दालय **पुस्तकवारी**
पुस्तकांची वारी... आपल्या दारी...

सर्व रसिक-वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

वरील व इतर दिवाळी अंक घरपोहोच मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा...
**90 11 20 1414**

### २८ ऑक्टोबर पर्यंत जाहीर होणार

# प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी

## जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतनिहाय अंतिम प्रभागसंख्या

अहिल्यानगर : खडलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेसाठी राज्य निवडणूक आयोगाने प्रभागनिहाय अंतिम मतदारयादी येत्या २८ ऑक्टोबरपर्यंत प्रसिद्ध करण्यास सांगितले आहे. यामध्ये जिल्ह्यातील ११ नगरपंचायती व १ नगरपरिषद अशा एकूण १२ पालिकांचा सामावेश आहे. यासाठी १ जुलै २०२५ ही अर्हता तारीख असणार आहे. दरम्यान या निवडणूक प्रस्तावित असलेल्या पालिकांची प्रारूप प्रभागरचनाही राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केली आहे.

जिल्ह्यातील श्रीरामपूर, कोपरगाव व संगमनेर या तीन ब वर्ग नगरपरिषदांसह क वर्ग गटातील जामखेड, राहाता, शेवगाव, राहुरी, श्रीगोंदे, पाथर्डी, देवळाली प्रवरा व शिर्डी नगरपरिषदांचा त्यामध्ये समावेश आहे, यासह नेवासा नगरपंचायतीच्याही निवडणुकीसाठी हा कार्यक्रम लागू आहे. प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर १३ ऑक्टोबरपर्यंत या प्रारूप मतदारयादीवर हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. या हरकती व सूचनांवर सुनावणी झाल्यानंतर २८ ऑक्टोबरला अंतिम प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर ७ नोव्हेंबरला मतदार केंद्रनिहाय यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

श्रीरामपूर १७, कोपरगाव १५, संगमनेर १५, जामखेड १२, राहाता १०, शेवगाव १२, राहुरी १२, श्रीगोंदे ११, पाथर्डी १०, देवळाली प्रवरा १०, शिर्डी ११, नेवासा नगरपंचायत १७.

या मतदारयादीसाठी १ जुलै ही अर्हता तारीख असणार आहे. जिल्ह्यातील १२ पालिकांच्या प्रारूप प्रभाग रचनेसही राज्य निवडणूक आयोगाने मान्यता देऊन ती अंतिम केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रारूप प्रभागरचनेवरील हरकतींवर सुनावणी घेऊन त्याचा अहवाल विभागीय आयुक्तांमार्फत राज्य सरकार व नंतर राज्य निवडणूक आयोगाला सादर केला होता. विधानसभेच्या मतदारयादीचे प्रभागनिहाय विभाजन करून ती यादी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी वापरता येणार असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे. नगरपरिषद व नगरपंचायतींच्या प्रभाग संख्येदेखील निश्चित करण्यात आली असली तरी नगराध्यक्ष पद व प्रभागांचे आरक्षण हा कार्यक्रम निवडणूक आयोगाने अद्याप जाहीर केलेला नाही. निवडणुकीतील उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्यांचे याच कार्यक्रमाकडे लक्ष आहे.

# हरभऱ्याच्या २२५ तर करडईच्या हमीभावात ६०० रुपयांची वाढ

### केंद्र सरकारकडून 'रब्बी'चे हमीभाव जाहीर

**पुणे :** केंद्र सरकारने २०२६-२७ च्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याच्या किमान आधारभूत किमतीत अर्थात हमीभावामध्ये प्रतिक्विंटल २२५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच गव्हाचा हमीभावात प्रतिकिटल १६० रुपये, तर मसूरच्या हमीभावात ३०० रुपये आणि करडईच्या हमीभावात ६०० रुपये तर मोहरीच्या हमीभावात २५० रुपये वाढ जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (ता.१०) आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीची बैठक झाली. या बैठकीम ध्ये रब्बी हंगामातील ६ पिकांच्या हमीभाव वाढीसाठी मंजूरी देण्यात आली आहे. यामध्ये बार्लीच्या हमीभावात १७० रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

सरकारने हरभऱ्यासाठी प्रतिक्विंटल ५ हजार ८७५ रुपये हमीभाव जाहीर केला आहे. तर गव्हासाठी २ हजार ५८५ रुपये, मसूरसाठी ७ हजार रुपये, मोहरीसाठी ६ हजार २०० रुपये, करडईसाठी ६ हजार ५४० रुपये आणि बार्लीसाठी २ हजार १५० रुपयाचा हमीभाव जाहीर केला आहे.

# दुकाने, हॉटेल्स यापुढे २४ तास खुली राहणार



**मुंबई :** १ ऑक्टोबर २०२५: महाराष्ट्र सरकारने २०१७ मध्ये घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार, राज्यातील बहुतेक दुकाने आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने २४ तास खुली ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. या निर्णयाचा उद्देश अर्थव्यवस्था मजबूत करणे, रोजगार वाढवणे आणि ग्राहकांना सोयीस्कर सेवा उपलब्ध करणे हा आहे. नुकत्याच झालेल्या बदलांनुसार, कामगार कायद्यात सुधारणा करून कामाचे तास वाढवण्यात आले आहेत, ज्यामुळे हा निर्णय अधिक प्रभावी होत आहे. मात्र, काही दुकानांना या नियमातून वगळण्यात आले आहे. ज्यामुळे त्यांना विशिष्ट वेळेनंतर बंद करावे लागते. २०१७ च्या महाराष्ट्र दुकाने आणि प्रतिष्ठाने (रोजगार नियमन आणि सेवा अटी) कायद्याने हे राज्य झाले. या कायद्यानुसार, दुकाने, हटिल्स, मॉल्स आणि रेस्टॉरंट्स २४ तास आणि आठवड्याचे सात दिवस खुली राहू शकतात. कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, एका कर्मचाऱ्याला दिवसाला ९ तासांपेक्षा जास्त काम करणे सक्तीचे नव्हते, पण २०२५ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार हा मर्यादा १० तासापर्यंत वाढवण्यात आला आहे. सामाजिक कामाचे तास ४८ पर्यंत मर्यादित आहेत, आणि ओव्हरटाइम साठी दुप्पट वेतन देणे बंधनकारक आहे. याशिवाय, कामाच्या वेळेत ६ तासांनंतर ३० मिनिटांचा विश्रांतीचा कालावधी अनिवार्य करण्यात आला आहे. या निर्णयाचे फायदे अनेक आहेत. मुंबईसारख्या शहरात रात्रीच्या वेळी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सोय होते, जसे की नाईट शिफ्टमध्ये काम करणारे कर्मचारी किंवा प्रवासी, रोजगार वाढतो कारण दुकानांना तीन शिफ्टमध्ये कर्मचारी ठेवावे लागतात, बॉम्बे हायकोर्टने नुकतेच एका प्रकरणात स्पष्ट केले की, कन्व्हिनियन्स स्टोर्ससारख्या दुकानांना २४ तास खुली ठेवण्यास कायद्याने मनाई नाही, ज्यामुळे हा निर्णय अधिक मजबूत झाला आहे.

# अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळाचा धोका

**पालघर :** अरबी समुद्रात निर्माण झालेल्या शक्ती चक्रीवादळामुळे पालघरसह मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या उत्तर म हाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. चक्रीवादळामुळे पालघर जिल्ह्याच्या समुद्र किनाऱ्याजवळील भागात ४ ते ८ ऑक्टोबर दरम्यान वादळी वाऱ्याचा (वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किमी) इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. किनारपट्टीजवळील नागरिकांनी अत्यंत सावध राहणे आवश्यक आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ४ ते ८ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हवामानात मोठे बदल अपेक्षित आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाचा भार!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई :** शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाल आहे. आम्ही सरकार म्हणून शेतकऱ्यांची पूर्ण ताकदीने मदत करणार आहोत. अतिवृष्टीग्रस्त कुटुंबात ज्या मुला-मुलींची लग्न ठरलेली असतील ती लग्न आम्ही शिवसेना पक्षातर्फे लावून देऊ, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाषणात जाहीर केले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मराठवाड्यात, विदर्भात अतिवृष्टीचे मोठं संकट आलं. अनेकांच्या आयुष्यात संकट आले आहे. यात अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. नुकसानग्रस्त कुटुंबातील ज्या मुला-मुलींची लग्नं ठरली असतील त्या सर्वांची लग्न लावून देण्याची जबाबदारी शिवसेना घेत आहे.

# कर्करोगावर होणार मोफत उपचार

### शंभर कोटींचा निधी : राज्यातील १८ रुग्णालयातून विशेषोपचार

**मुंबई :** राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण (Maharashtra Cancer Policy) निश्चित केले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन (महाकेअर फाऊंडेशन – MAHACARE Foundation) स्थापन करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (devendra Fadnavis) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या माध्यमातून राज्यभरातील १८ रुग्णालयांमध्ये विशेषोपचार सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची एल-१, एल-२ आणि एल-३ अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. टाटा स्मारक रुग्णालय हे एल-१ स्तरावरील शिखर केंद्र असेल. एल-२ स्तरावर ८ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत, ज्यात छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबईतील जे. जे. रुग्णालय, कोल्हापूर, पुण्यातील बी.जे. मेडिकल कॉलेज तसेच नाशिक आणि अमरावतीतील सार्वजनिक आरोग्य विभागाची संदर्भ रुग्णालये यांचा समावेश आहे. एल-३ स्तरावर अंबाजोगाई, नांदेड, यवतमाळ, सातारा, बारामती, जळगाव, रत्नागिरी, मुंबईतील कामा-अल्ब्लेस रुग्णालय आणि शिर्डी संस्थानचे रुग्णालय अशा ९ रुग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे.

Maharashtra Cancer Hospital List : कोणत्या रुग्णालयात कर्करोग उपचार मिळणार?

१. टाटा स्मारक रुग्णालय, २. छत्रपती संभाजीनगर, ३. चंद्रपूर , ४. नागपूर, ५. मुंबई – जे. जे. रुग्णालय , ६. कोल्हापूर, ७. पुणे – बी.जे. मेडिकल कॉलेज, ८. नाशिक सार्वजनिक आरोग्य विभागाचे संदर्भ रुग्णालय, ९. अमरावती – सार्वजनिक आरोग्य विभागाचे संदर्भ रुग्णालय, १०. अंबाजोगाई, ११. नांदेड, १२. यवतमाळ, १३. सातारा, १४. बारामती, १५. जळगाव, १६. रत्नागिरी, १७. मुंबई – कामा-अल्ब्लेस रुग्णालय, १८. शिर्डी संस्थानचे रुग्णालय, या केंद्रांमध्ये रेडिओथेरपी, किमोथेरपी, शस्त्रक्रिया, पॅलेटिव्ह केअर, मानसिक आधार, औषधसुविधा तसेच संशोधन आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. एल-२ स्तरावरील रुग्णालयांमध्ये एमडी, एमएएस, डीएम-एमसीएच, डीएनबीसारख्या कोर्ससाठी फेलोशिप उपलब्ध होणार आहे.

पान १ वरून

### जनतेचा विश्वास जपण्याचे काम करा

लोणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय नियुक्ती आदेश वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

या सोहळ्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस झालेले व अनुकंपा तत्त्वावर नियुक्त झालेल्या ३३८ उमेदवारांना नियुक्ती आदेश वाटप करण्यात आले. यावेळी आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील म्हणाले, राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एका दिवसात तब्बल १० हजार तरुणांना शासकीय सेवेत दाखल करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने आतापर्यंत सुमारे ५० हजार शासकीय पदे पारदर्शक पद्धतीने भरली आहेत, यात कुठेही भ्रष्टाचाराचा आरोप झालेला नाही, हे अधोरेखित करताना त्यांनी नव्या पिढीला प्रशासनातील उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून काम करण्याचे आवाहन केले. तसेच, तरुणांनी आपल्या आई-वडिलांची काळजी घेण्याचे व त्यांचा सांभाळ करण्याचे कर्तव्यही विसरू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

यानिमित्त मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या राज्यस्तरीय अनुकंपा आणि लिपिक नियुक्ती आदेश वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले.

### पूरग्रस्तांकडून कर्जवसुली थांबवा


करणार आहे. दोन-तीन दिवसांत पंचनामे पूर्ण करून पुढील आठवड्यात केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाने स्वतः च्या निधीतून मदतीला सुरुवात केली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. म राठवाड्यातील पूरस्थिती गंभीर असून राज्य सरकारने सुमारे ६० लाख हेक्टर शेतीच्या नुकसानीची नोंद घेतली आहे. आतापर्यंत २,२१५ कोटी रुपयांच्या म दतीच्या वितरणास सुरुवात झाली असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळेल. असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले. ओल्या दुष्काळासंबंधी विचारले असता. सध्या आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत (मॅन्युअल) अशी कोणतीही व्याख्या नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### कुणबीचे चुकीचे दाखले दिल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई

मंत्री अतुल सावे, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार आणि ओबीसी संघटनांचे सुमारे ४० प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांनी माध्यमांना माहिती दिली. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले, मराठा-कुणबी प्रमाणपत्राच्या जीआरचा कुणीही गैरफायदा घेऊ नये व बनावट प्रमाणपत्रे दिली जाऊ नयेत, यावर सरकार आणि शिष्टमंडळ यांचे एकमत झाले आहे. बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी काही अधिकाऱ्यांनी खोटे दाखले दिल्याचे पुरावे सादर केले. यावर, जर एखाद्या अधिकाऱ्याने खोटे प्रमाणपत्र दिले, तर त्याला तो अधिकारीच जबाबदार असेल आणि त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी निक्षून सांगितले आहे. या बैठकीत केवळ प्रमाणपत्रांवरच नव्हे, तर महाज्योतीला निधी, ओबीसी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना उद्योगासाठी सवलती आणि कमी व्याजदराचे कर्ज यांसारख्या ओबीसी समाजाच्या इतर मागण्यांवरही सकारात्मक चर्चा झाली.

# जिल्हा परिषदेची शाळा ठरली जगातील सर्वोत्तम

## खेड तालुक्यातील शाळेला वर्ड्स बेस्ट स्कूलचा कम्युनिटी चॉइस पुरस्कार



**पुणे :** जगभरातील नामवंत खासगी शाळांमध्ये आपलं वेगळं स्थान निर्माण करत, पुणे जिल्हा परिषदेच्या खेड तालुक्यातील जालिंदरनगर प्राथमिक शाळेने वर्ल्डस बेस्ट स्कूल कम्युनिटी चॉइस अवॉर्ड हा जागतिक दर्जाचा पुरस्कार पटकावला आहे. हा पुरस्कार टी फोर एज्युकेशन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थेकडून दिला जातो. शिक्षणातील नवकल्पना, सामाजिक प्रभाव आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेने केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे हा सन्मान देण्यात आला आहे.

या पुरस्काराचे वितरण १५ नोव्हेंबर रोजी अबूधाबी येथे करण्यात येणार असून, विजेत्या शाळेला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल. या यशामुळे जालिंदरनगर शाळा भारतातील एकमेव शाळा ठरली आहे, जिला या स्पर्धेत जागतिक कीर्ती प्राप्त झाली आहे.

शाळेचे मुख्याध्यापक संदीप म्हसुडगे आणि शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने सहअध्ययन मॉडेल यशस्वीरित्या राबवले. या मॉडेलमध्ये मोठ्या वयोगटातील विद्यार्थी लहान विद्यार्थ्यांना शिकवतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि भावनिक जवळीक निर्माण झाली आहे.

शाळेत कोडिंग, प्रोग्रामिंग, रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, तसेच सुतारकाम व प्लंबिंग यांसारख्या कौशल्यांचाही समावेश आहे. तज्ज्ञ पालकांचा सहभाग आणि शाळेच्या भौतिक सुविधांसाठी लोकसहभाग, उडठ निधी आणि प्रशासनाचा पाठिंबा मिळवून शाळेने शिक्षणात अभिनव प्रयोग केले आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले, हा पुरस्कार केवळ सन्मान नाही, तर शाळेची शिक्षणपद्धती, प्रेरणादायी शिक्षक, आधुनिक तंत्रज्ञान आणि नैतिक मूल्यांवर आधारित शिक्षणामुळे मिळालेली जागतिक मान्यता आहे. या यशाचे मुख्य आधारस्तंभ शिक्षक आणि विद्यार्थी आहेत.

शाळेची पटसंख्या सध्या १४० असून, ग्रामीण भागातील ही शाळा आता जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवणारी ठरली आहे. शिक्षक दत्तात्रय वारे म्हणाले, एका खेडेगावातील सरकारी शाळेने जागतिक स्तरावर मोठ्या खासगी शाळांशी स्पर्धा करणे, हे आमच्यासाठी स्वप्नवत आहे. हा पुरस्कार दाखवतो की सरकारी शाळांमध्येही अमाप क्षमता आहे. आम्ही पुढेही सरकारी शिक्षणासाठी अशीच कामगिरी करत राहू. या यशामुळे पुणे जिल्हा परिषदेच्या शैक्षणिक कार्याला जागतिक ओळख मिळाली असून, भविष्यात अशा अनेक आदर्श शैक्षणिक संस्था निर्माण होण्यासाठी ही प्रेरणा ठरणार आहे.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Digital India · Vision India · Make in India · MSME

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# जिल्ह्यातील जातीय तणावावर उपमुख्यमंत्री पवारांची दखल



**अहिल्यानगर :** शहरातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि. २ ऑक्टोबर) उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन शहरासह संपूर्ण जिल्ह्यात वारंवार घडत असलेल्या जातीय तणावाच्या घटनांकडे गांभीर्याने लक्ष वेधले. शिष्टमंडळाचे सदस्यांनी उपमुख्यमंत्र्यांना सांगितले की, काही स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जातीयवादी संघटनांद्वारे समाजात धार्मिक द्वेष पसरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि या कृत्यांमुळे अल्पसंख्यांक मुस्लिम समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उपमुख्यमंत्री पवार यांनी या प्रकरणावर गंभीर चर्चा करून शिष्टमंडळाला आश्वस्त केले की, शहर व जिल्ह्यात कुणीही जातीय तणाव निर्माण करणारा असेल, त्याच्या विरोधात कोणत्याही पक्षाच्या आधारावर विचार न करता कठोर कारवाई केली जाईल. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना स्पष्टपणे आदेश दिले की, जातीय तणाव निर्माण करणाऱ्या प्रत्येक घटनेवर त्वरित लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी.

मोहल्ला कमिटी तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवारांनी पोलीस प्रशासनाला केवळ दोषींवर कारवाई करण्यापुरते मर्यादित न राहता, प्रत्येक महत्त्वाच्या परिसरात म ोहल्ला कमिटी तयार करण्याचे निर्देश दिले. या कमिटींचा उद्देश फक्त तणाव कमी करणे नाही, तर समाजातील लोकांमध्ये समज वाढवणे, शक्यतो तणाव निर्माण होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हा आहे.

शहरातील वाढत्या जातीय तणावामुळेपोलीस प्रशासनानेही सतर्क राहणे आवश्यक आहे. विशेषतः कोठला येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनाच्या आरोपीपैकी अनेकांची अटक त्यांच्या घटनेशी संबंध नसतानाही करण्यात आली होती. शिष्टमंडळाने याबाबत तक्रार करत सांगितले की, पोलिसांनी इतर गुन्ह्यांखाली नाव घेतल्याने निष्पाप नागरिकांना त्रास होत आहे. यावर उपमुख्यमंत्री पवारांनी त्वरित दखल घेतली आणि प्रशासनाला निर्दे ष दिले की, दोषीविरुद्धच कारवाई करावी; निष्पापांवर अन्यायकारक छळ थांबवावा.

शहरात नुकत्याच घडलेल्या आय लव्ह मोहम्मद रांगोळी प्रकरणामुळेही जातीय तणाव वाढला आहे. शिष्टमंडळाने या प्रकरणातील आरोपी व त्याच्या कुटुंबीयांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासून आरोपीला हद्दपार करण्याची मागणी केली. तसेच, हे कृत्य घडविण्याच्या मागे असलेला मास्टर माइंड कोण आहे, त्याचा शोध घेण्याची मागणी देखील केली गेली. शिष्टमंडळाने या भेटीत स्पष्ट केले की, जर स्थानिक प्रशासन आणि पोलीस प्रशासन या घटनांकडे दुर्लक्ष करत राहिले, तर समाजातील अल्पसंख्यांक समुदायावर होणारा दबाव वाढेल आणि शहरातील शांतता कायम ठेवणे कठीण होईल. त्यामुळे उपमुख्यमंत्री पवार यांनी घेतलेली दखल ही समाजासाठी सकारात्मक ठरणार आहे. शहर च जिल्ह्यातील जातीय तणावाचे कारण फक्त व्यक्तीगत द्वेष किंवा राजकीय स्पर्धा नसून, समाजातील काही घटक समाजात धार्मिक द्वेष पसरविण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून कृती करीत आहेत. उपमुख्यमंत्री अजीत पवारांनी दिलेली दखल आणि कठोर कारवाईच्या आदेशामुळे नागरिकांना आशा आहे की, येत्या काळात शहरातील शांतता कायम राहील आणि अल्पसंख्याक समुदायावर होणारा दबाव कमी होईल. या भेटीमुळे प्रशासनाची जबाबदारी स्पष्ट झाली आहे. आणि पोलीस प्रशासनाला योग्य पावले उचलणे आवश्यक आहे.

# ई-बाँड प्रणालीचा शुभारंभ

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने महसूल क्षेत्रात एक मोठा निर्णय घेत ई-बाँड प्रणालीचा शुभारंभ केला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, या निर्णयामुळे कागदी बाँडची आवश्यकता संपुष्टात येणार आहे. यामुळे आयातदार आणि निर्यातदारांना मोठा दिलासा मिळणार असून व्यवहार अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि गतिमान होतील.

महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागामार्फत, National E-Governance Services Limited (NeSL) National Informatics Centre (NIC) यांच्या तांत्रिक सहाय्याने कस्टम ई-बाँड प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ही प्रक्रिया डिजीटल इंडिया आणि Ease of Doing Business या केंद्र सरकारच्या म हत्वाकांक्षी उपक्रमांना बळ देणारी ठरणार आहे. सीमाशुल्क प्रक्रिया अधिक गतिम आणि ान होऊन आयात-निर्यातीस चालना मिळणार आहे. महाराष्ट्राच्या महसूल व्यवस्थेमध्ये हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. व्यवसायिक सुलभता आणि पारदर्शकतेच्या दिशेने राज्य सरकारकडून घेतलेला हा निर्णय निश्चितच स्तुत्य आहे.

# देशातील पहिल्या सहकारी सीएनजी प्रकल्पाचे आज उदघाटन



**कोपरगाव :** साखर उद्योगात नव्या युगाची सुरुवात झाली असून, उसाच्या टाकाऊ पदार्थापासून सीएनजी निर्मितीची क्रांतिकारी प्रक्रिया आता सुरु झाली आहे. कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना हा देशातील पहिला कारखाना ठरला आहे, जिथे ऊसप्रक्रियेतील वाया जाणाऱ्या पदार्थांपासून थेट कॉम्प्रेस बायोगॅस (सीएनजी) व स्प्रे ड्रायर पोटॅश ग्रेन्युएल निर्मिती केली जात आहे. या प्रकल्पाचे उदघाटन उद्या (रविवार) केंद्रीय गृहमंत्री आणि देशाचे पहिले सहकारमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे.

दुपारी दीड वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्री व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे, कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी माजी मंत्री स्वर्गीय शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून आदर्शवत वाटचाल केली आहे त्याचाच हा परिपाक मानला जातो आहे. आजच्या काळात पेट्रोल व डिझेलच्या तुलनेत सीएनजीवर चालणाऱ्या वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर इंधन म्हणून सीएनजीचा वापर वाढत असताना, कोपरगाव येथील हा अभिनव उपक्रम सहकार क्षेत्रासाठी नवा मैलाचा दगड ठरणार आहे. असा पथदर्शी प्रकल्प उभारणारा हा कारखाना ठरतो आहे. दररोज १२ टन सीएनजी निर्मितीची क्षमता अन्नदाता ते उर्जादाता या संकल्पनेतून संजीवनी उद्योग समूहाचे कारखान्यात हा अत्याधुनिक सीएनजी प्रकल्प उभारला आहे, अशी माहिती कारखाना अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांनी दिली आहे. कारखान्याचे सांडपाणी व डिस्टिलरी स्पेंडमधून मिथेन वायू वेगळा करून शुद्ध स्वरूपातील सीएनजी तयार करण्याची ही प्रक्रिया पर्यावरण संवर्धनासाठी आदर्श ठरणारी आहे.


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भुताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**


# भारताची कसोटी सामन्यावर मजबूत पकड; राहुल, जुरेल आणि जडेजाचे शतक



अहमदाबाद : भारत आणि वेस्ट इंडिज यांच्या होत असलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर भारताने मजबूत पकड घेतली आहे. केएल राहुल, ध्रवु जुरेल आणि अष्टपैलू रवींद्र जडेजा यांनी शतकी खेळी केली. त्यामुळे दुसऱ्या दिवसाअखेर भारताकडे २८६ धावांची मोठी आघाडी आहे.

दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने तीन शतके झळकावली. केएल राहुली बरोबर शंभर धावा केल्या, तर यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलने पहिले पहिले कसोटी शतक ठोकले. पंतची जागा घेणाऱ्या जुरेलने अतिशय खास पद्धतीने साजरे केले. जुरेलने त्याचे शतक पूर्ण केले तेव्हा त्याने बंदुकीसारखे बॅट धरली आणि सलामीचा इशारा दिला. दिवसाच्या खेळानंतर जुरेलने यामागील रहस्य उलगडले, तो म्हणाला, जेव्हा मी माझे अर्धशतक पूर्ण केले, तेव्हा मी माझे सेलिब्रेशन माझ्या वडिलांना समर्पित केले, तर माझे शतक सेलिब्रेशन भारतीय सैन्याला समर्पित होते.

ते किती मेहनत करतात हे मी जवळून पाहिले आहे. जुरेलचे वडील भारतीय सैन्यात होते. १२५ धावा काढून तो बाद झाला. दरम्यान रवींद्र जडेजानेही शतक केले असून तो १०४ धावांवर नाबाद आहे. भारतीय फलंदाजांनी वेस्ट इंडिजची गोलंदाजी एकदम निष्प्रभ ठरवली. पहिल्या दिवशी कर्णधार गिलनेही अर्धशतक फटकावले. भारत आता किती मोठी आघाडी घेऊन डाव घोषित करतो. याचा विचार वेस्ट इंजिचे गोलंदाज करत असतील. दुसऱ्या दिवसाअखेर भारताने पाच गडी गमावून ४४८ धावांचा डोंगर उभारला आहे.

एकाच डावात तीन भारतीय फलंदाजांनी शतके झळकावण्याची तिसरी वेळ आहे. या वर्षी टीम इंडिया इंग्लंड दौऱ्यावर असताना, एकाच डावात दोन सामन्यांमध्ये तीन भारतीय फलंदाजांनी शतके झळकावली. यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल आणि रिषभ पंत यांनी लीडस कसोटीत शतके झळकावली. त्यानंतर शुभमन गिल, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी मँचेस्टर कसोटीत शतके झळकावली. आता, केएल राहुल आणि ध्रुव जुरेल यांच्यानंतर रवींद्र जडेजानेही शतक झळकावले आहे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021